ePaper
महाविकास आघाडीचा 17 डिसेंबरला मुंबईत मोर्चा



| वर्ष - 6 | अंक - 232 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत

- राज्यपालांविरोधात पुण्याच्या माजी महापौरांचे
- "उसणे अवसान" राष्ट्रवादीला सत्ता मिळवून देईल काय?
- न्यायाचा बळी जाऊ नये म्हणून..

www.mahaenews.com | मंगळवार | दिनांक 6 डिसेंबर 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# खासदार बारणे जोमात, ठाकरे सेना कोमात?

## उद्या मेळावा : ठाकरे गटामध्ये कमालीची शांतता

**।पिंपरी।**
**। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**महाविकास आघाडीतील प्रमुख घटकपक्ष शिवसेनेत राजकीय दुफळी निर्माण झाल्यानंतर राज्यात शिंदे-फडणवीस सरकार स्थापन झाले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेच्या वाघाची शिकार केली. सत्ता ताब्यात असल्यामुळे खासदारही शिंदे गटात समील झाले. मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांनीही राष्ट्रवादीविरोधात एल्गार केला आणि बाळासाहेबांच्या शिवसेनेचा भगवा खांद्यावर घेतला.**







परिणामी, पिंपरी-चिंचवड शिवसेनेला मोठा फटका बसला. त्यानंतर शिरुर लोकसभा मतदार संघाचे माजी खासदार शिवाजीराव आढळराव आणि शहरातील कामगार नेते इरफान सय्यद यांनीही शिंदे गटात उडी मारली. त्यामुळे ठाकरे गटाची ताकद कमी झाली आहे.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे शहरप्रमुख ॲड. सचिन भोसले यांनी किरकोळ आंदोलने करीत पक्षाचे अस्तित्व जिवंत ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. मात्र, आजी-माजी खासदार, प्रमुख नेते शिंदे गटात सामील झाल्यामुळे ठाकरे सेना अक्षरश: कोमात गेली आहे.

दरम्यान, बाळासाहेबांच्या शिवसेनेचे पिंपरी, चिंचवड आणि मावळचे पदाधिकारी येत्या (बुधवारी) जाहीर केले जाणार आहे.

उपनेते, खासदार श्रीरंग बारणे पदाधिका-यांची घोषणा आणि मार्गदर्शन करणार आहेत. चिंचवड येथील ॲटो क्लस्टर सभागृहात बुधवारी (दि.7) सकाळी साडे अकरा वाजता हा मेळावा होणार आहे. आगामी पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीच्या मैदानात बाळासाहेबांची शिवसेना पूर्ण ताकदीनिशी उतरणार आहे. त्यादृष्टीने पक्षाचे काम सुरु आहे. पदाधिका-यांच्या नियुक्त्या केल्या जात आहे. पक्ष संघटन वाढविण्यात येत आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबत मावळचे खासदार श्रीरंग बारणे गेल्यानंतर शहरातील अनेक पदाधिकारी त्यांच्यासोबत गेले आहेत.

### खासदार बारणे शक्तीप्रदर्शन करणार...

**बाळासाहेबांची शिवसेनेचा पिंपरी-चिंचवडमध्ये पहिल्यांदाच मेळावा होणार आहे. मावळ, पिंपरी आणि चिंचवडमधील पदाधिकारी घोषित केले जाणार आहेत. खासदार बारणे यांच्या हस्ते नियुक्ती पत्रे देण्यात येणार आहेत. आगामी निवडणुकीच्या अनुषंगाने खासदार बारणे पदाधिका-यांना मार्गदर्शन करणार आहेत. खासदार बारणे यांनी मावळ लोकसभा मतदार संघातून राज्याचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांचे पुत्र पार्थ पवार यांचा पराभव केला आहे. त्यामुळे पवार विरुद्ध बारणे असा राजकीय संघर्ष असून, बारणे आगामी महापालिका, विधानसभा आणि लोकसभा निवडणुकीत राष्ट्रवादीला थेट आव्हान देणार आहेत. त्यामुळे शहरातील पहिल्याच मेळाव्याच्या निमित्ताने खासदार बारणे जोरदार शक्तीप्रदर्शन करण्याच्या तयारीत आहेत.**

# महापालिका शाळेतील दहावीतील ७ विद्यार्थी 'लखपती

## गुणवंत विद्यार्थ्यांना बक्षीसे : एकूण 140 विद्यार्थ्यांची बाजी

**।पिंपरी-चिंचवड ।**
**। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**पिंपरी-चिंचवड महापालिका माध्यमिक विद्यालयातील दहावीच्या परीक्षेत ८० टक्क्यांपेक्षा जादा गुण संपादन करणाऱ्या १४० गुणवंत विद्यार्थ्यांना आणि १० दिव्यांग विद्यार्थ्यांना बक्षिसे दिली जाणार आहेत. त्यामध्ये सात विद्यार्थ्यांनी यंदा एक लाखाचे बक्षीस पटकावले आहे. या विद्यार्थ्यांच्या बक्षिसापोटी महापालिकेचा ५६ लाख ७५ रुपये खर्च होणार आहे.**

माध्यमिक विद्यालयातील गुणवंत आणि दिव्यांग विद्यार्थ्यांना दहावीच्या परीक्षेत ८० टक्क्यांपेक्षा जादा गुण संपादन करणाऱ्यांना बक्षीस देण्यात येते. दहावीचा निकाल १७ जूनला लागला. महापालिका माध्यमिक विद्यालयांचा निकाल यंदा ८९ टक्के लागला आहे. सन २००८-२००९ पासून ही योजना राबविण्यात येत आहे. सन २०१५-१६ या वर्षापासून या योजनेत बदल केला आहे.



त्यानुसार, महापालिकेच्या १८ माध्यमिक विद्यालयातील ९० टक्क्यांपेक्षा जादा गुण घेणाऱ्या सात विद्यार्थ्यांना प्रत्येकी एक लाख रुपये बक्षीस देण्यात येणार आहे. ८५ ते ८९.९९ टक्क्यांपर्यंत गुण मिळविणाऱ्या ४६ विद्यार्थ्यांना प्रत्येकी ५० हजार रुपये तर ८० ते ८४.९९ टक्के गुण मिळविणाऱ्या ८७ विद्यार्थ्यांना प्रत्येकी २५ हजार रुपये बक्षीस मिळणार आहे. ३५ टक्क्यांपेक्षा जादा गुण मिळविणाऱ्या आणि ४० टक्के अपंगत्व असलेल्या १० दिव्यांग विद्यार्थ्यांना प्रत्येकी ५० हजार रुपये बक्षीस देण्यात येणार आहे, असे एकूण १४० विद्यार्थी बक्षिसाचे मानकरी ठरले आहेत.

# ८ डिसेंबरला पिंपरी-चिंचवड बंद!

## विविध राजकीय पक्ष व संघटना सहभागी होणार

**पिंपरी ।**
**। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

महाराष्ट्रातील महापुरुषांच्या बदनामी विरोधात विविध राजकीय पक्ष व संघटना यांनी ८ डिसेंबर २०२२ रोजी पिंपरी-चिंचवड शहर बंद पुकारला आहे. याबाबतची घोषणा बहुजन महापुरुष सन्मान समिती यांनी घेतलेल्या पत्रकार परिषदेत आज सोमवारी केली.

सामाजिक कार्यकर्ते मारुती भापकर म्हणाले की, या बंदमध्ये काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना, महाराष्ट्र नवनिर्माण सेना, बहुजन समाज पार्टी, एमआयएम, आम आदमी पार्टी या सारखे राजकीय पक्ष सहभागी असतील. तसेच १०० हून अधिक विविध सामाजिक संघटना जसे संभाजी ब्रिगेड, मराठा सेवा संघ, छावा सन्घटना, मराठा क्रांती मोर्चा, प्रहार व इतर संघटनांनी या बंदला पाठिंबा दिला आहे. हे सर्व राजकीय पक्ष व सामाजिक संघटना ८ डिसेंबर रोजीच्या शहर बंद मध्ये सहभागी असतील. हा बंद सकाळी ७ ते सायंकाळी ५ वा पर्यंत असेल. यामध्ये पिंपरी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याजवळ धरणे आंदोलन सकाळी १० ते संध्याकाळी ५ वा पर्यंत असेल. पिंपरी-चिंचवड राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे म्हणाले की, वारंवार बहुजन महापुरुषांचा जसे छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिराव फुले,

(उर्वरित वृत्त पान 3 वर)

# राज्यपालांविरोधात पुण्याच्या माजी महापौरांचे राजभवनापुढे धरणे आंदोलन!

## राज्यपालांना हटवणयाची मागणी जोर धरू लागली

पिंपरी ।
।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

छत्रपती शिवाजी महाराजांविरोधात वादग्रस्त विधान केल्याप्रकरणी राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्या विरोधात पुणे शहरातील माजी महापौरांकडून धरणे आंदोलन करण्यात आले. राजभवनासमोर माजी महापौरांनी राज्यपालांविरोधात घोषणा दिल्या. राज्यपाल पदमुक्त होत नाहीत, तोपर्यंत त्यांचा निषेध केला जाईल, असे यावेळी जाहीर करण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराज यांच्याविरोधात राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी काही दिवसांपूर्वी वादग्रस्त विधान केले होते. त्याचे तीव्र पडसाद राज्यात उमटत आहेत. राज्यपालांविरोधात अद्यापही आंदोलने, निदर्शने सुरूच आहेत. शहरातील माजी महापौर संघटनेनेही दंड थोपटले आहेत. माजी महापौर संघटनेच्यावतीने राष्ट्रवादीचे प्रवक्ते अंकुश काकडे यांच्या पुढाकारातून हे आंदोलन करण्यात आले. माजी महापौर शांतीलाल सुरतवाला, प्रशांत जगताप, कमल व्यवहारे, कमल ढोले पाटील, वैशाली बनकर, राजलक्ष्मी भोसले, रजनी त्रिभुवन, दत्ता गायकवाड, निलेश मगर, राजेश साने, दीपक मानकर, महेश हांडे, उदय महाले, निलेश निकम यावेळी उपस्थित होते. भारतीय जनता पक्षाचे माजी महापौर मुक्ता टिळक आणि मुरलीधर मोहोळ यांनी मात्र या आंदोलनाकडे पाठ फिरवली.



छत्रपती शिवाजी महाराजांचा अवमान खपवून घेतला जाणार नाही. त्यामुळे राज्यपालांविरोधात यापुढेही तीव्र निदर्शने केली जातील. या आंदोलनात राज्यपाल हटाव अशी मागणी करण्यात आली, असे माजी महापौर, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रवक्ते अंकुश काकडे यांनी सांगितले.

# किड्स ब्रेन ॲकॅडमीतर्फे राष्ट्रीय अबॅकस स्पर्धा

## तब्बल 158 विद्यार्थ्यांचा सहभाग : मान्यवरांकडून कौतुकाची थाप

पिंपरी ।
।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

किड्स ब्रेन ॲकॅडमीमार्फत स. न. बी. पी आंतरराष्ट्रीय शाळा, मोरवाडी येथे खुल्या राष्ट्रीय स्तरावरील अबॅकस व रुबिक क्यूबच्या स्पर्धा परीक्षेचे आयोजन करण्यात आले.

यामध्ये एकूण १५८ विध्यार्थी सहभाग घेतला. स्पर्धेतील उत्तीर्ण विद्यार्थ्यांना बक्षीस वाटप करण्यात आले.

यावेळी बालकल्याण संस्थेच्या संचालक अपर्णा पानसे, कोथरुड येथील पूना अंध शाळेच्या मुख्याध्यापिका जयश्री थत्ते आदी उपस्थित होते.

उलेखणीय बाब म्हणजे किड्स ब्रेन अकादमीच्या संचालिका पल्लवी थिटे यांना अवघ्या ६ लेक्चर दिलेल्या अंध कन्या शाळा कोथरूच्या ८ वी च्या वर्गाने अबॅकसबाबत प्रत्यक्ष प्रात्यक्षिक करून दाखवले व प्रश्नांची उत्तरे काही क्षणात देवून कौतुकाची थाप मिळवली.



# मनमानी पद्धतीने कामकाज सुरू असलेल्या सहकारी पत संस्थांच्या विरोधात संघर्ष करू

## माजी खासदार किरीट सोमय्या यांचा इशारा

मंचर ।
।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

'राज्यात सहकारी पतसंस्थांचा मनमानी कारभार सुरु आहे. कर्जदार शेतकऱ्यांची फसवणूक सुरु आहे. कर्ज देण्याच्या नावाखाली पतसंस्थांकडून शोषण केले जाते. अनेकांच्या जमिनी दबावाखाली ताब्यात घेऊन त्यावर कर्जाचा बोजा चढविला जातो. पतसंस्थेच्या माध्यमातून माफिया, राजकारणी, अधिकाऱ्यांचा काळा पैसा लपवला जात असून राज्यातील सर्व पतसंस्थांची तपासणी होणे गरजेचे आहे. गैरव्यवहारात पतसंस्थांचे अधिकारी, कर्मचारी व पदाधिकारी सहभागी असतात.त्या विरोधात राज्यभर संघर्ष करून संबंधिताना धडा शिकवू.' असा इशारा भारतीय जनता पक्षाचे प्रवक्ते माजी खासदार किरीट सोमय्या यांनी दिला.



अवसरी फाटा (ता. आंबेगाव) येथे शासकीय विश्रामगृहात सोमवारी (ता. ५) झालेल्या पत्रकार परिषदेत सोमय्या बोलत होते. यावेळी भाजपचे जिल्हाध्यक्ष गणेश भेगडे, भाजपचे नेते जालिंदर कामठे, संपर्कप्रमुख जयसिंगराव एरंडे,तालुका अध्यक्ष डॉ. ताराचंद कराळे, संदीप बाणखेले, सुशांत थोरात, गणेश बाणखेले, प्रमोद बाणखेले उपस्थित होते. पत्रकार परिषदेतच १४ कर्जदारांनी मंचर येथील संत ज्ञानेश्वर पतसंस्थेसह आंबेगाव व जुन्नर तालुक्यातील सहा पतसंस्थांच्या कामकाजाविषयी तक्रार केली. हा संदर्भ घेऊन सोमय्या म्हणाले, 'गेली तीन ते चार वर्ष पतसंस्थाच्या कारभाराचा अभ्यास करत आहे. अनेक शेतकऱ्यांनी माझ्याकडे तक्रारी केल्या आहेत. धक्कादायक प्रकार ऐकून आश्चर्य वाटले. त्यामुळे मी पतसंस्थांचा कारभार चवाठ्यावर आणणार आहे. केंद्राचे सहकार खाते गृहमंत्री अमित शहा यांच्याकडे आहे. त्यांच्यासह मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडेही याबाबत पाठपुरावा करून फसवणूक झालेल्या शेतकऱ्यांना न्याय मिळवून देणार आहे.' संत ज्ञानेश्वर पतसंस्थेने कर्जदारांचे कोरे धनादेश आघाऊ घेतले.हा प्रकार चुकीचा आहे. मालमत्तेची मुल्यांकन चुकीची आहेत. कर्ज रक्कम पुन्हा अन्य बँकेतून पतसंस्थेत जमा होते. पतसंस्थेत आर्थिक घोटाळा झाला आहे. सहकार खात्याने चौकशीचे आदेश दिले आहेत. दरम्यान मंचर येथील सहाय्यक निबंधक (सहकार) कार्यालय, पंजाब नॅशनल बँक व मंचर पोलीस ठाण्यात भेट देऊन संत ज्ञानेश्वर पतसंस्थेविषयी चर्चा केली.

'छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल सर्वांना आदर आहे.राजकीय क्षेत्रातील काहीजण बोलताना त्यांच्याकडून शब्द मागेपुढे होतात. आम्ही जे आहोत ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्यामुळेच आहोत. सर्वांनी बोलताना तारतम्य बाळगावे.असे सोमय्या म्हणाले.'

# “उसणे अवसान” राष्ट्रवादीला सत्ता मिळवून देईल काय?

## महापालिका निवडणुकीत लागणार कस: शहराध्यक्ष अजित गव्हाणेंची एकाकी झुंज





**पिंपरी । महाईन्यूज । सुनील आढाव**

**पिंपरी-चिंचवड राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीत नवा-जुना आणि ज्येष्ठ-कनिष्ठ असा वाद उफाळून आला आहे. त्यामुळे केवळ आंदोलन आणि मोर्चातून शहराच्या सत्तेपर्यंतचा प्रवास कठीण दिसत असून, भाजपातील बंडखोरांवर भिस्त ठेवली जात आहे. परिणामी, स्थानिक पदाधिकाऱ्यांकडे असलेले “उसणे अवसान” महापालिका निवडणुकीत सत्ता मिळवून देईल काय? याचे आत्मचिंतन करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे.**

दि.१० जून १९९९ रोजी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीची स्थापना झाली. मात्र, पिंपरी-चिंचवड शहराच्या स्थापनेपासून काँग्रेसच्या माध्यमातून सत्तेत असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीतील स्थानिक नेत्यांनी २००२ मध्ये खऱ्या अर्थाने शहराची सूत्रे हाती घेतली. राष्ट्रवादीचे “कारभारी” आणि राज्याचे विद्यमान विरोधी पक्षनेते अजित पवार यांच्या नेतृत्त्वाखाली २०१७ पर्यंत १५ वर्षे सत्ता राखली.या सत्ताकाळात पिंपरी-चिंचवडमध्ये माजी आमदार विलास लांडे, माजी महापौर आझम पानसरे, आमदार लक्ष्मण जगताप, अण्णा बनसोडे, माजी महापौर संजोग वाघेरे, योगेश बहल अशी नेत्यांची खंबीर फळी निर्माण झाली. मात्र, एकाही नेत्याला राज्यात नेतृत्व करण्याची संधी मिळाली नाही. यासह अनेक महापौर आणि स्थायी समिती सभापती, सत्तारुढ पक्षनेते तयार झाले. पण, १५ वर्षांत शहराला एकदाही मंत्रीपद किंवा मंत्री दर्जाचे महामंडळ किंवा विधान परिषदेवर नेतृत्व करण्याची संधी मिळाली नाही. अपवाद आझम पानसरे यांचा होता. त्यामुळे राष्ट्रवादीत निष्ठावंतांना संधी मिळत नाही, असा ‘परसेप्शन सेट’ झाला आहे.

परिणामी, राष्ट्रवादीच्या स्थापनेपासून काम करणाऱ्या नेत्यांना महत्त्वाच्या पदांवर संधी मिळाली नाही. त्यामुळे उदासीन असलेल्या स्थानिक नेत्यांनी २०१७ मध्ये पक्षाकडे पाठ फिरवली. त्याचा फटका महापालिका निवडणूक आणि त्यानंतर २०१९ मधील विधानसभा, लोकसभा निवडणुकीतही बसला. त्यामुळे राष्ट्रवादीतील ज्येष्ठांनी अर्थात लांडे, वाघेरे, बनसोडे आदींनी कार्यक्रमापुरते पक्षकार्य सुरू ठेवले.

### भाजपाकडे निष्ठावंतांना संधी...

२०१७ मध्ये भारतीय जनता पार्टीला पिंपरी-चिंचवड महापालिकेत सत्ता मिळाली. त्यानंतर राज्यसभा खासदारपदी अमर साबळे, पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणावर सदाशीव खाडे, राज्य लोकलेखा समितीच्या अध्यक्षपदी ॲ. सचिन पटवर्धन, अण्णाभाऊ साठे महामंडळाच्या अध्यक्षपदी अमित गोरखे, माथाडी महामंडळावर अनुप मोरे, विधान परिषदेवर उमा खापरे असे अनेक निष्ठावंतांना संधी देण्यात आली. स्वीकृत सदस्यपदी निष्ठावंतांची वर्णी लागली. प्रदेश संघटनात्मक महत्त्वाच्या पदावंर शहरातील जुन्या नेत्यांना न्याय मिळाला. त्यामुळे भाजपामध्ये आपल्याला संधी आणि न्याय मिळेल, अशी भावना निर्माण झाली आहे. त्यामुळेच महाविकास आघाडीच्या सत्ताकाळात २० ते २५ नगरसेवक फुटतील अशी अपेक्षा असताना प्रत्यक्षात भाजपा एकसंघ राहिलेला पहायला मिळाला.

### ज्येष्ठांची शांत भूमिका अन् गव्हाणेंची एकाकी झुंज...

दरम्यान, अजित पवार यांनी संघटनात्मक बदल करीत अजित गव्हाणे यांचा जबाबदारी दिली. गव्हाणे यांचे नेतृत्व शहरव्यापी कदापि नाही. किंबहुना त्यांना शहरव्यापी संघटन करण्याची महत्त्वाकांक्षाही दिसत नाही. त्यांनी भोसरी आणि स्वत:च्या प्रभागात प्रभाव निर्माण करण्याची भूमिका ठेवली. ज्येष्ठांनी बोटचेपी भूमिका घेतल्यामुळे गव्हाणे एकाकी झुंज देत आहेत.

### अजित गव्हाणेंनी आत्मचिंतन करावे...

नव्या फळीतील कार्यकर्त्यांनी भाजपाला आव्हान देणे सकारात्मक बाब आहे. पण, ज्येष्ठांनी ताकद मिळाल्याखेरीज भाजपाला रोखणे शक्य नाही. आजच्या घडीला पिंपरी-चिंचवडमधील राजकारणातील बलाढ्य अजगरासारखे नेतृत्व असलेले नेते म्हणजे माजी आमदार विलास लांडे आहेत, ही वस्तुस्थिती आहे. आजही लांडे पूर्ण ताकदीने मैदानात उरतले, तर राजकीयदृष्या गिळंकृत करु शकतात. ज्याअर्थी, लांडे शांत आहेत. तिथे राष्ट्रवादीत आत्मचिंतनाची गरज आहे, याचा विचार अजित गव्हाणे आणि टीमने केला पाहिजे. अन्यथा “ उसणे अवसान” आणून सत्ता मिळणार नाही, हे निर्विवाद सत्य आहे.

# महापरिनिर्वाण दिनी पिंपरीतील वाहतुकीत बदल

## वाहतूक पोलिस : नाशिक फाटा ते महावीर चौक सेवा रस्ता बंद

**पिंपरी ।**
**। महाईन्यूज । प्रतिनिधी।**



महापरिनिर्वाण दिनाच्या पार्श्वभूमीवर पिंपरीतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथील पुतळ्यास अभिवादन करण्याकरिता मोठ्या प्रमाणात भाविक / अनुयायी येत असतात. त्यामुळे चौकात मोठ्या प्रमाणात गर्दी होत असते. या गर्दीमुळे वाहतूक कोंडी होवू नये, वाहतूक सुरळीत रहावी यासाठी पिंपरी चौकातील वाहतूक मंगळवारी (दि.६) रोजी दुपारनंतर तात्पुरत्या स्वरुपात अन्य मार्गाने वळविण्यात येणार आहे, अशी माहिती वाहतूक शाखेचे सहायक पोलीस आयुक्त सतिश माने यांनी दिली आहे.

महाविर चौक चिंचवडकडून डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक पिंपरीकडे सर्व्हिस रोडने येणारी वाहतुक बंद करून ती डी-मार्ट इन ग्रेड सेपरेटर मधुन इच्छित स्थळी जातील.

नाशिक फाटयाकडून डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक पिंपरीकडे सर्व्हिस रोडने येणाऱ्या वाहनांना प्रवेश बंद करण्यात येत आहे. ही वाहने डेअरी फार्म ग्रेड सेपरेटर इन व एच.पी. पंप खराळवाडी ग्रेड सेपरेटर इनमध्ये प्रवेश करुन इच्छित स्थळी जातील. स्व.इंदिरा गांधी पूल ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक पिंपरीकडे येणाऱ्या वाहनांना प्रवेश बंद करण्यात येत असुन ही वाहने स्व. इंदिरा गांधी पुलावरुन मोरवाडी चौकाकडे जावुन इच्छित स्थळी जातील. नेहरुनगर चौकाकडून डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक पिंपरीकडे येणाऱ्या वाहनांना प्रवेश बंद करण्यात येत असुन ही वाहने एच. ए. कॉर्नर बस स्टॉप येथून मासुळकर कॉलनी व तेथुन इच्छित स्थळी जातील.

### महाराष्ट्रातील महापुरुषांची बदनामी

# ८ डिसेंबरला पिंपरी-चिंचवड बंद!

(पान 1 वरून)

ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्याबद्दल अपमानकारक वक्तव्य केली जात आहेत. ते जाणीवपूर्वक करत आहेत त्यामुळे हा बंद पुकारला आहे. एक वेळेस चूक होते वारंवार चुका होत नाहीत. हा एक षडयंत्राचा भाग आहे.

मनसे शहराध्यक्ष सचिन चिखले म्हणाले की, शहरातील औद्योगिक संघटनांशी बोलणे झालेले आहे व व ते सर्व गुरुवारी होणाऱ्या बंदमध्ये सहभागी होणार आहेत. बंदमध्ये सत्ताधारी भारतीय जनता पार्टीच्या सहभागबद्दल विचारले असता चिखले म्हणाले की, मी माजी सत्तारूढ पक्षनेता नामदेव ढाके यांच्याशी बंद बाबत बोललो असताना ते म्हणाले की, पक्षातील वरिष्ठांशी चर्चा करून याबाबत निर्णय घेतला जाईल. सामाजिक कार्यकर्ते मारुती भापकर म्हणाले की, भाजपचे नेते महेश कुलकर्णी यांच्याशी बोलणे झाले आहे मात्र त्यांच्याकडून अद्याप काही कळवण्यात आलेले नाही. स्वराज पक्षाचे मानव कांबळे म्हणाले की, बेरोजगारी बेकारी भ्रष्टाचार या प्रश्नांकडे लोकांचे दुर्लक्ष व्हावे यासाठी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि त्यांची यंत्रणा काम करत आहे. त्याचाच एका भाग म्हणून बहुजन महापुरुषांची बदनामी करण्यात येत आहे. हाजी गुलजार भाई म्हणाले की, शहरातील सर्व मुस्लिम संघटना या बंदमध्ये सहभागी होतील. शिवसेनेचे माजी आमदार गौतम चाबुकस्वार, बंदमध्ये सहभागी होणाऱ्या सर्व रजकीय पक्षांचे अध्यक्ष, प्रतिनिधी व कार्यकर्ते यावेळीस उपस्थित होते.

### बहुजन महापुरुष सन्मान समिती यांच्या मागण्या..

१) महाराष्ट्राचे राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांची ताबडतोब राज्यपाल पदावरून ताबडतोब हकालपट्टी करण्यात यावी.

२) भाजपचे राष्ट्रीय प्रवक्ते सुधांशू त्रिवेदी यांनी ताबडतोब देशातील जनतेची माफी मागावी.

३) मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपली भूमिका स्पष्ट करून जनतेची माफी मागावी.

## संपादकीय »

# छत्रपतींची आता सटकली!

***'शिवाजी' हा शब्द उलटा वापरला तर, तो 'जीवाशि' कसा येतो, ह्याचा अनुभव राज्यपाल भगतसिंह कोश्यारी गेले २-३ वर्षं घेतच होते. पण आता ते घाऊक भावात घेत आहेत. कारण आता छत्रपती शिवरायांना 'जुना-पुराना' ठरवल्याने त्यांच्यावर स्वतःची मोडतोड भंगार करून घ्यायची पाळी त्यांच्यावर आली आहे. आता ते कशाही कारणाने 'राज्यपाल' पदावर राहिले काय नि गेले काय; त्याने काहीही फरक पडणार नाही.***

इतकी त्यांनी स्वत: बरोबरच 'राज्यपाल' पदाचीही इज्जत गमावलीय. ती 'मोदी सरकार'च्या काळात भरून येणे शक्य नाही.त्यामुळे 'राज्यपाल' पदावरून कोश्यारींना हटवलं तरी 'नगास नग'च येणार, ह्याची खात्री असावी. कारण, ज्या राज्यात 'भाजप'विरोधी पक्ष- आघाडीची सत्ता आहे किंवा 'भाजप' युतीची सत्ता आहे; विरोधात प्रबळ राजकीय पक्ष- नेते आहेत; तिथे कोश्यारी यांच्यासारखेच 'नको त्या उचापती' करणारे 'राज्यपाल' केंद्र सत्तेने बसवले आहेत.

पश्चिम बंगालमध्ये 'तृणमूल काँग्रेस' नेत्या व मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांना चाप लावण्यासाठी जगदीप धंखर यांची 'राज्यपाल' पदी नेमणूक झाली होती. परंतु, त्यांच्या दिल्लीच्या इशाऱ्यावरून केल्या जाणाऱ्या कारवायांना ममता पुरून उरल्यात. आता त्यांच्या जागी सी.वी. आनंद बोस यांची राज्यपाल म्हणून नियुक्ती झालीय. दिल्लीचे 'नायब राज्यपाल' विनय कुमार सक्सेना हेदेखील 'आप सरकार'चे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या कारभारात आडकाठ्या घालीत असतात. केरळात मुख्यमंत्री पिनराई विजयन यांचं 'मार्क्सवादी कम्युनिस्ट पार्टी'चे सरकार आहे. तिथे आरिफ खान हे 'राज्यपाल' आहेत. पण तेही 'शंकराचार्यांनी हजार वर्ष भारत अखंड ठेवला होता', अशी धार्मिक द्वेष वाढवणारी विधानं करतात. 'राज्यपाल' हे 'संविधानिक' पद आहे. त्यांची नियुक्ती 'राष्ट्रपती' करीत असले तरी ती 'केंद्र सरकार'च्या; त्यातही प्रधानमंत्री व गृहमंत्र्यांच्या शिफारशीनुसार होत असते. त्यात बहुतांश व्यक्ती राजकीय क्षेत्रातील ज्येष्ठ असतात. क्वचित, माजी न्यायमूर्ती वा अन्य क्षेत्रातील व्यक्ती असतात. पणे ते केंद्रीय सत्ताधीशाच्या वा त्यांच्या पक्षाच्या विचाराचे असणे, आवश्यक असते. ही राज्यपाल मंडळी केंद्र सत्तेच्या विरोधी पक्षातील राज्य सरकारं पाडण्यासाठी व केंद्र सत्तेच्या विचाराचं अल्पमतातलं सरकार आणण्यासाठी कसे उपयुक्त ठरतात, ते अलीकडे, कर्नाटक, मध्य प्रदेश, महाराष्ट्र, गोवा ह्या राज्यात आपल्याला पाहायला मिळालंय. अशा राजकारणाशी संबंधित उद्योग कोश्यारींनी केले असते; तर त्यांच्यावरची टीका 'भाजप' विरोधी पक्ष- नेत्यांनी करण्यापुरती मर्यादित राहिली असती. पण ते लोकभावना भडकतील असे काहीबाही बोलत राहिले आणि लोकसंताप ओढवून घेतला.

# न्यायाचा बळी जाऊ नये म्हणून..




सर्वोच्च तसेच उच्च न्यायालयातील न्यायाधीशांच्या नेमणुकीवरून सध्या न्यायपालिका आणि केंद्र सरकार यांच्यामध्ये सुरू असलेला वाद लौकर संपणे आवश्यक आहे. दोन्ही बाजूंनी प्रश्न मिटवण्यात धोरणीपणा दाखवला नाही, तर सर्वसामान्य भारतीय नागरिकांचेच नुकसान होईल.सर्वोच्च न्यायालयाचे खंडपीठ आणि केंद्रीय कायदेमंत्री यांच्यातील वैचारिक आदानप्रदान (वृत्तपत्रांमध्ये नोंदवल्याप्रमाणे) पुढीलप्रमाणे आहे.

सर्वोच्च न्यायालयाचे खंडपीठ : त्यांना देऊ दे आम्हाला अधिकार. आम्हाला काहीच अडचण नाही. आमचे आम्हाला बघू दे, असे वरच्या पातळीवरची व्यक्ती म्हणत असेल, तर आमचे आम्ही करू. त्यात काहीच अडचण नाही. भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद १२४ (२) आणि अनुच्छेद २१७ (१) च्या व्याख्येवरून सर्वोच्च न्यायालय आणि कार्यकारिणी यांच्यात बरीच कटुता आहे. मूळ तरतुदींनुसार, नियुक्तीचा अधिकार केवळ सर्वोच्च न्यायालय आणि संबंधित उच्च न्यायालय यांच्याकडेच होता. त्यासाठी एक राष्ट्रीय न्यायिक नियुक्ती आयोग ही कार्यकारिणी होती. संबंधित कार्यकारिणी आणि दोन्ही न्यायालये सल्लामसलत करून ही नियुक्ती करत असत. गेल्या ४० वर्षांपासून, अशी प्रथा होती की राज्य सरकार संबंधित उच्च न्यायालयाचा सल्ला घ्यायचे आणि केंद्र सरकारकडे नावांची शिफारस द्यायचे. केंद्र सरकार अनुच्छेद २१७ मधील कार्यपद्धतीचे पालन करत त्या न्यायाधीशांची उच्च न्यायालयात



नियुक्ती करायचे. त्याचप्रमाणे, सर्वोच्च न्यायालयाच्या बाबतीतही व्हायचे. केंद्र सरकार नावांच्या शिफारसीनुसार आणि अनुच्छेद १२४ मधील प्रक्रियेनुसार सर्वोच्च न्यायालयात न्यायाधीशांची नियुक्ती करायचे. अनेक मान्यवर न्यायाधीशांची नियुक्ती या पद्धतीने कार्यकारिणीने केली आहे; अर्थात याला काही अपवादही निघाले, ही गोष्ट वेगळी.

द्वितीय न्यायाधीश प्रकरण (१९९३) आणि तृतीय न्यायाधीश प्रकरणा (१९९८)मध्ये कायद्याचा जो अर्थ लावला गेला, त्यात ही पद्धत बदलली (अनुक्रमे १९८१, १९९३ आणि १९९८ ही सर्वोच्च न्यायालयाचे तीन निवाडे तीन न्यायाधीश खटले – थ्री जजेस केसेस म्हणून ओळखले जातात.). न्यायवृंद या नावाची नवीन प्रणाली पुढे आली. सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालयांसाठी न्यायाधीशांची निवड करण्याचा अधिकार न्यायवृंद प्रणालीच्या ताब्यात गेला. केंद्र सरकार न्यायवृंदाने दिलेल्या शिफारसी स्वीकारू शकते किंवा मागे घेऊ शकते. सरकारने नाकारलेल्या शिफारसी न्यायवृंदाने परत पाठवल्यास सरकार नियुक्ती करण्यास बांधील राहते. ही पद्धत आली खरी, पहिल्या ४० वर्षांत नियुक्त केलेल्या न्यायाधीशांच्या गुणवत्तेपेक्षा नवीन प्रक्रियेत नियुक्त झालेल्या न्यायाधीशांची गुणवत्ता चांगली आहे, असे काही म्हणता येणार नाही. दोन्ही पद्धतींमध्ये अनेक मान्यवर न्यायाधीश नेमले गेले पण काही अपवादही होतेच.

१९९३ पासून सत्तेवर असलेल्या प्रत्येक सरकारने या बदललेल्या प्रक्रियेविरोधात कठोर भूमिका घेतली आहे. तथापि, नरेंद्र मोदी सरकारच्या काळात नियुक्त्या रोखणे ही एक नित्याची प्रथा होऊन गेली. दोन न्यायमूर्तींनी निदर्शनास आणून दिले त्यानुसार न्यायवृंदाने पुन्हा पाठवलेल्या शिफारशीही या सरकारने रद्द केल्या आहेत. वास्तविक असे करणे हे कायद्याच्या विरोधात आहे. परिणामी (१ जुलै २०२२ पर्यंत) सर्वोच्च न्यायालयात न्यायाधीशांची सात पदे रिक्त आहेत. तर उच्च न्यायालयांमध्ये न्यायाधीशांच्या मंजूर ११०८ पदांपैकी ३८१ पदे रिक्त आहेत.

# चाँदनी चौकातून: दिल्ली अभी दूर?

**भाजप आणि आम आदमी पक्षाच्या नेत्यांची प्रचंड धावपळ सुरू होती. एकाच वेळी त्यांना गुजरात आणि दिल्ली दोन्हीकडं प्रचाराला जायचं होतं. भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा तर जमिनीवर कमी आणि हवेत जास्त होते. हिमाचल प्रदेश त्यांचं मूळ राज्य. तिथं तर प्रचारात झोकून द्यावंच लागणार होतं. इतकं करूनही भाजपला जिंकण्याची खात्री नाही.**

हिमाचल प्रदेशचा प्रचार संपेपर्यंत गुजरातचा प्रचार शिखराला पोहोचला, त्यात दिल्ली महापालिका निवडणुकीसाठी वॉर्डा-वॉर्डात जावं लागत होतं. नड्डांना सगळीकडं धावावं लागत होतं. आता त्यांना थोडी उसंत मिळेल असं म्हणत असताना, भाजपच्या बैठकांचा सिलसिला सुरू झालाय, संसदेचं अधिवेशनही आहे. गुजरातप्रमाणं भाजपनं दिल्ली महापालिका निवडणुकीच्या प्रचारातही नेत्यांची फौज उतरवली होती. मराठी खासदार-नेते गुजरातमध्ये प्रचारात उतरले नव्हते पण, दिल्लीत त्यांच्या छोटेखानी सभा झाल्या. नितीन गडकरी, प्रकाश जावडेकर, भागवत कराड, सुनील देवधर या मराठी नेत्यांनी



दिल्लीकरांकडे मतांचा जोगवा मागितला. कराडांनी दिल्लीत मराठी मतदारांकडे भाजपसाठी मते मागितली. या सगळ्या नेत्यांच्या प्रचाराचे रूपांतर जागांमध्ये किती होते, हे बुधवारी समजेल. या वेळी सगळं लक्ष गुजरातकडं असल्यामुळं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी दिल्ली महापालिकेच्या प्रचाराकडं फारसं लक्ष दिलं नाही, त्यांच्या प्रचारफेऱ्याही तुलनेत कमी झाल्या. राजनाथ सिंह, अनुराग ठाकूर, हिमंत बिस्वा-शर्मा, योगी आदित्यनाथ, शिवराजसिंह चौहान या बड्या नेत्यांनी प्रचार केला खरा, पण, ही निवडणूक भाजपनं सोडून दिली असावी असा सूर उमटू लागला आहे. गुजरातमध्ये आम आदमी पक्षाला आणि दिल्ली महापालिकेत भाजपला किती जागा मिळतात, हा मोठा कुतूहलाचा विषय बनलाय.

संसदेच्या अधिवेशनाचा कारभार आता दोन राजस्थानी पीठासीन अधिकाऱ्यांच्या ताब्यात असेल. लोकसभाध्यक्ष ओम बिर्ला आणि राज्यसभेचे सभापती जगदीप धनखड. दोघेही मूळचे राजस्थानचे. धनखडांचा प्रवास समाजवादाकडून भाजपच्या हिंदूत्वाकडे झाला. बिर्ला भाजपचे! धनखडांची उपराष्ट्रपतीपदी निवड होईपर्यंत संसदेचं पावसाळी अधिवेशन संपून गेलं. व्यंकय्या नायडूंकडून स्वागताची त्यांची संधी हुकली. या वेळी हिवाळी अधिवेशनात पहिल्यांदाच धनखड राज्यसभेत सभापतींच्या आसनावर स्थानापन्न होतील. तृणमूल काँग्रेसने त्यांना पाठिंबा दिल्यामुळे सभागृहामध्ये धनखड आणि तृणमूलच्या खासदार यांच्यातील संभाव्य रस्सीखेच बघण्याची उत्सुकता नाहीशी झाली आहे. पण, नायडूंच्या तुलनेत धनखड सभागृहाचं कामकाज किती 'बोलकेपणा'ने हाताळतात, त्यावर तहकुबी ठरतील. नायडूंना राष्ट्रपती व्हायचं होतं असं म्हणतात पण, ती संधी मिळालीच नाही. ते राष्ट्रपती झाले असते तर 'विजनवासा'त गेले असते. राष्ट्रपतींच्या बोलण्यावर राज्यसभेतील सभापतींच्या तुलनेत थोडी जास्त 'बंधनं' असतात. नायडूंना बोलायची फार सवय. राज्यसभेच्या सभापतीपदाच्या काळात नायडूंनी 'खास वाक्यप्रयोगां'पासून खासदारांना 'सज्जड सूचना' देण्यापर्यंत अनेकदा आपल्या अधिकाराचा वापर केलेला पाहिला आहे.नितीन गडकरी जसे पाहुण्यांना मेजवानी देऊन तृप्त करतात, तसे नायडूही खासदारांना खादिष्ट भोजनाच्या पाहुणचाराने खूश करत असत. धनखडांनी राज्यसभेतील खासदारांशी टप्प्या-टप्प्याने भेटीगाठी सुरू केल्या आहेत. मेजवानीचा घाट धनखडांनीही घातलेला आहे. गेल्या महिनाभरात पाचदा धनखडांनी खासदारांना गटागटाने भोजनाला घरी बोलवून त्यांच्याशी गप्पाटप्पा केल्या आहेत. संसदेचे हिवाळी अधिवेशन सुरू होण्यापूर्वी सभागृहातील सदस्यांशी समन्वय साधण्याचा हा सोपा मार्ग असतो. या मेजवानीमध्ये फक्त भाजपचे खासदार होते असं नव्हे, सर्वपक्षीय खासदारांना धनखडांनी निमंत्रण दिलेलं होतं. नायडूंप्रमाणं धनखडांच्याही मेजवान्यांचे किस्से पुढच्या पाच वर्षांमध्ये ऐकायला मिळू शकतील. धनखडांचे सार्वजनिक कार्यक्रम तर आधीपासूनच सुरू झालेले आहेत. लोकसभाध्यक्ष ओम बिर्ला यांच्याही कार्यक्रमांचं आयोजन होत असतं. त्यांच्या भाषणांची फारशी चर्चा झालेली नाही. धनखडांची भाषणं मात्र आत्तापासून दखलपात्र होऊ लागली आहे. धनखड सभागृहात आणि बाहेरही लक्षवेधी ठरणार असं दिसतंय.

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# राजेशाहीतून लोकशाहीकडे : उद्धव ठाकरेंचं अभिनंदन!

## भाजपकडून उद्धव ठाकरे यांच्यासह शरद पवार यांच्यावर निशाणा

चंद्रशेखर बावनकुळे यांनी ट्विट करत म्हटलं आहे की, "उद्धव ठाकरे जे कधीही बाहेर पडत नव्हते, ते प्रकाश आंबेडकरांना भेटायला जातात, तो प्रस्ताव घेऊन अजित पवारांच्या घरी जातात. राजेशाहीतून लोकशाहीच्या मूल्यांकडे होत असलेल्या या प्रवासाबद्दल त्यांचे अभिनंदन. लोकशाही मूल्ये जपणाऱ्या प्रत्येक घडामोडींचे भाजपाने कायमच स्वागत केले आहे." "G20 सारख्या महत्त्वाच्या बैठकीसाठी शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांना रितसर 15 नोव्हेंबर 2022 रोजी निमंत्रण पाठवून, दोनवेळा फोनवर अगत्याने निमंत्रण देऊन सुद्धा त्या बैठकीला न जाता, आजचाच दिवस आपण बैठकीसाठी निवडला, यातून राष्ट्रवैभवाप्रती सुद्धा आपली नियत दिसून आली" असा टोला बावनकुळे यांनी लगावला.

। मुंबई । महाईन्यूज ।

राष्ट्रवादीचे नेते अजित पवार यांच्या निवासस्थानी आज मविआ मधील तीन पक्षांची बैठक झाली. या बैठकीत वेगवेगळ्या विषयांवर चर्चा झाली दरम्यान भाजपकडून माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यासह राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांच्यावर निशाणा साधण्यात आला आहे. भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत बावनकुळे यांनी राजेशाहीतून लोकशाहीच्या मूल्यांकडे होत असलेल्या प्रवासाबद्दल उद्धव ठाकरे यांचे अभिनंदन अशा शब्दात खोचक टोला लगवला आहे.



चंद्रशेखर बावनकुळे यांनी ट्विट करत म्हटलं आहे की, "उद्धव ठाकरे जे कधीही बाहेर पडत नव्हते, ते प्रकाश आंबेडकरांना भेटायला जातात, तो प्रस्ताव घेऊन अजित पवारांच्या घरी जातात. राजेशाहीतून लोकशाहीच्या मूल्यांकडे होत असलेल्या या प्रवासाबद्दल त्यांचे अभिनंदन. लोकशाही मूल्ये जपणाऱ्या प्रत्येक घडामोडींचे भाजपाने कायमच स्वागत केले आहे." "G20 सारख्या महत्त्वाच्या बैठकीसाठी शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांना रितसर 15 नोव्हेंबर 2022 रोजी निमंत्रण पाठवून, दोनवेळा फोनवर अगत्याने निमंत्रण देऊन सुद्धा त्या बैठकीला न जाता, आजचाच दिवस आपण बैठकीसाठी निवडला, यातून राष्ट्रवैभवाप्रती सुद्धा आपली नियत दिसून आली" असा टोला बावनकुळे यांनी लगावला.

पुढे बावनकुळे म्हणाले की, "असो, राष्ट्र प्रथम आणि लोकशाही मूल्य यावर आपल्या आणि सवंगड्यांबाबत न बोललेलेच बरे. तरीसुद्धा मातोश्रीचा उंबरठा ओलांडून आपण बाहेर आलात. अभिनंदन! पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात नियतीला सुद्धा राजेशाहीचा लोकशाहीकडचाच प्रवास अभिप्रेत आहे" असे बावनकुळे म्हणाले आहेत. महाराष्ट्राच्या अपमानाविरोधात महाविकास आघाडीकडून विराट मोर्चा काढण्यात येणार आहे. मविआच्या बैठकीत याबाबत निर्णय झाला आहे.

त्यानुसार १७ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता जिजामाता उद्यान ते आझाद मैदान असा हा मोर्चा निघणार आहे. यामध्ये सर्व महाराष्ट्र प्रेमींनी सहभागी व्हावं असं आवाहन मविआच्या नेत्यांकडून करण्यात आलं आहे. बैठकीनंतर झालेल्या पत्रकार परिषदेत उद्धव ठाकरे म्हणाले, "राज्यातील सरकार आता कायदेशीर की बेकायदेशीर याचा निकाल लागायचा आहे. पण हे सरकार अस्तित्वात आल्यानंतर महाराष्ट्राचा सातत्यानं अपमान होतोय. फुटिरतेची बीज इथं रोवली जात आहेत. यामध्ये शिवाजी महाराजांचा महाराष्ट्र तोडण्याचा हेतू पुरस्सर प्रयत्न सुरु आहे.

## अक्कलकोटमधील ११ गावांचा कर्नाटकात सामील होण्याचा ठराव

। मुंबई । महाईन्यूज ।

अक्कलकोट व दक्षिण सोलापूर तालुक्यात २८ गावांमध्ये कर्नाटकात सामील होण्यासाठी काही मूठभर मंडळी जाणीवपूर्वक आंदोलनाचे नाटक करीत असल्यामुळे एकीकडे मराठी सीमा भागात तणाव वाढत आहे. तर दुसरीकडे अक्कलकोट तालुक्यातील ११ गावांनी स्थानिक विकासाच्या प्रश्नाचे निमित्त पुढे करीत कर्नाटकात सामील होण्याची मागणी केली आहे. या गावांनी मंजूर केलेल्या ठरावासह जिल्हाधिकारी कार्यालयात निवेदन सादर करण्यात आले आहे.

कलकर्जाळ, शेगाव, हिळ्ळी, कोर्सेगाव, कांदेवाडी खुर्द, आळगी, मंगरूळ, धारसंग, शावळ, देवीकवठे आदी गावांनी कर्नाटकात सामील होण्याची मागणी करणारे ठराव संमत करून जिल्हाधिकारी कार्यालयास सादर केले आहे.

## महाराष्ट्र तोडण्याचा हेतूपुरस्सर प्रयत्न होतोय

### शिवसेना (ठाकरे गट) पक्ष प्रमुख उद्धव ठाकरेंचा भाजपावर हल्लाबोल

। मुंबई । महाईन्यूज ।

महाविकास आघाडीचे सरकार गद्दारी आणि कटकारस्थान करून पाडले. हे सरकार कायदेशीर की बेकायदेशीर याचा निकाल लागायचा आहे. पण, ते अस्तित्वात आल्यानंतर महाराष्ट्राची सातत्याने होणारी अवहेलना, अपमान आणि फुटीरतेची बीजं टाकण्यात येत आहेत. काही गाव कर्नाटकात, तेलंगणा आणि गुजरातमध्ये जायचं म्हणत आहेत. हे आजपर्यंत कधी घडलेलं नव्हतं. छत्रपतींचा एकसंध महाराष्ट्र तोडण्याचा प्रयत्न हेतुपुरस्सर होतोय, असा हल्लाबोल शिवसेना ( ठाकरे गट ) पक्ष प्रमुख उद्धव ठाकरेंनी भाजपावर केला आहे.

महाविकास आघाडीची बैठक पार पडल्यानंतर उद्धव ठाकरे बोलत होते. यावेळी विरोधी पक्षनेते अजित पवार, काँग्रेसचे नेते बाळासाहेब थोरात, माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण आणि महाविकास आघाडीतील अन्य नेते यावेळी उपस्थित होते. यावेळी उद्धव ठाकरेंनी शिंदे सरकारचा समाचार घेतला आहे. "कर्नाटक सरकार आक्रमकपणे महाराष्ट्रातील गावांवर हक्क सांगत आहे. अक्कलकोट, सोलापूर आणि मग पंढरपूरच्या विठोबावर सुद्धा ते हक्क सांगतील. त्यामुळे आपल्या राज्यात सरकार आहे का नाही? हा प्रश्न निर्माण झाला आहे," असे उद्धव ठाकरे यांनी म्हटलं.

"राज्यपाल म्हणून कोणीही येतात,



कोठूनही पाठवले जातात. राज्यपाल आहे म्हणून मान राखला जातो. पण, हेच राज्यपाल छत्रपती शिवाजी महाराज, ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले यांचा अपमान करत आहेत.

## १७ डिसेंबर रोजी महाविकास आघाडीचा सरकारविरोधात मुंबईत भव्य महामोर्चा

### मुंबईत जिजामाता उद्याने ते आझाद मैदानापर्यंत भव्य मोर्चा काढण्यात येणार : अजित पवार

। मुंबई । महाईन्यूज ।

**महाराष्ट्राचं आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज, क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्यासारख्या महापुरुषांचा घटनात्मक पदांवर बसलेल्या व्यक्तींकडून सातत्याने अपमान होत आहे. सीमाभागातील गावांकडून महाराष्ट्रबाहेर जाण्याची इतिहासात पहिल्यांदाच होत असलेली मागणी, मोठमोठे प्रकल्प राज्याबाहेर पळवल्याने नुकसान होत आहे. त्याविरोधात १७ तारखेला मुंबईत जिजामाता उद्याने ते आझाद मैदानापर्यंत भव्य मोर्चा काढण्यात येणार.**



या मोर्चात सर्व महाराष्ट्र अभिमानी नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन विधानसभेचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी केले आहे. "वाढती महागाई, बेरोजगारी, संकटग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा देण्यात आलेलं अपयश, अशा अनेक आघाड्यांवर राज्यातील विद्यमान शिंदे-फडणवीस सरकार सपशेल अपयशी ठरलं आहे. महाराष्ट्राचा अभिमान, स्वाभिमान, राज्याच्या हिताचे रक्षण या सरकारकडून होऊ शकलं नाही. कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांच्या 'अरे' ला 'कारे' म्हणण्याची धमक या सरकारमध्ये नाही," अशी टीकाही अजित पवार यांनी केली आहे. माजी मुख्यमंत्री, शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली महाविकास आघाडी भक्कम असून आघाडीतील प्रमुख नेत्यांची बैठक आज अजित पवार यांच्या 'देवगिरी' या शासकीय निवासस्थानी आयोजित करण्यात आली होती. या बैठकीनंतर पत्रकारांशी संवाद साधताना अजित पवार यांनी राज्यातील विद्यमान शिंदे-फडणवीस सरकारच्या अपयशावर कडाडून हल्ला चढवला. "राज्याच्या सीमाभागातील गावांनी महाराष्ट्राबाहेर जाण्याची मागणी करावी, असं यापूर्वी कधीही घडलं नव्हतं. यामागे कोण आहे याचा शोध घेतला पाहिजे. घटनात्मक पदांवरील व्यक्तींनी महापुरुषांचा अवमान करण्याचं दुस्साहस यापूर्वी कधीही केलं नव्हतं. महाराष्ट्राचा मुख्यमंत्री यापूर्वी कधीही हतबल दिसला नव्हता. राज्य मंत्रिमंडळाने निर्णय घेऊनही, माध्यमांमध्ये तसे जाहीर करूनही राज्याचे दोन मंत्री मराठी भाषिक बेळगाव मध्ये जाऊ शकले नाहीत, ही वस्तुस्थिती आहे.

महाराष्ट्राच्या मंत्र्यांना बेळगावमध्ये बंदी कशी होऊ शकते आणि महाराष्ट्र सरकार हे कसं सहन करतं, हे समजत नाही," असेही अजित पवार म्हणाले.

"महाविकास आघाडीने आयोजित केलेल्या मोर्चाआधी राज्यपालांना पदावरून हटवलं तरीही हा मोर्चा निघणारच. नांदेडमधील देगलूर, सांगलीतील जत, सोलापुरातील अक्कलकोट, गुजरात सीमेलगतच्या नंदुरबार जिल्ह्यातील तसेच अन्य गावांसाठी महाविकास आघाडी सरकारने अनेक विकासकामे जाहीर करून त्यासाठी निधीही उपलब्ध केला होता.

## महाराष्ट्र-कर्नाटक सीमावाद :

# राज्यातील मंत्र्यांचा दौरा स्थगित!

### चंद्रकांत पाटील आणि शंभुराज देसाई यांचा दौरा तूर्त रद्द करण्यात आला

**। नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**महाराष्ट्र-कर्नाटक सीमावादाप्रकरणी महाराष्ट्राचे मंत्री चंद्रकांत पाटील आणि शंभुराज देसाई हे मंगळवारी सीमा भागात जाऊन मराठी बांधवांची भेट घेणार होते. पण आता त्यांचा हा दौरा तूर्त रद्द करण्यात आला आहे. हा दौरा लांबवणीवर टाकण्यात आल्याचे समजते. गेल्या काही दिवसांपासून महाराष्ट्र-कर्नाटक सीमावाद चांगला तापला आहे. कर्नाटक सरकारने महाराष्ट्रातील सीमाभागातील गावांना पाणी सोडल्याने सरकारच्या गावकऱ्यांची समजूत काढणे महाराष्ट्र सरकाराठी कठीण झाल्याचे दिसत आहे.**



**सीमावादाप्रकरणी महाराष्ट्राचे मंत्री चंद्रकांत पाटील आणि शंभुराज देसाई यांचा दौरा रद्द झाल्यानंतर या वाढत्या महाराष्ट्र-कर्नाटकमधील सीमावादाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे आज दिल्लीत केंद्रीय गृहमंत्री अमित शहांची भेट घेणार आहेत. मुख्यमंत्री शिंदे हे सीमावादावर अमित शहांशी चर्चा करणार असल्याचे सांगितले जात आहे. त्याशिवाय, सीमावाद चिघळू नये यासाठी मंत्र्यांना तूर्तास दौऱ्यावर न जाण्याच्या सूचना दिल्याचे सांगितले जात आहे.**

सीमावादाप्रकरणी महाराष्ट्राचे मंत्री चंद्रकांत पाटील आणि शंभुराज देसाई यांचा दौरा रद्द झाल्यानंतर या वाढत्या महाराष्ट्र-कर्नाटकमधील सीमावादाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे आज दिल्लीत केंद्रीय गृहमंत्री अमित शहांची भेट घेणार आहेत. मुख्यमंत्री शिंदे हे सीमावादावर अमित शहांशी चर्चा करणार असल्याचे सांगितले जात आहे. त्याशिवाय, सीमावाद चिघळू नये यासाठी मंत्र्यांना तूर्तास दौऱ्यावर न जाण्याच्या सूचना दिल्याचे सांगितले जात आहे. महाराष्ट्र कर्नाटक सीमावादावर तोडगा काढण्यासाठी राज्यातील शिंदे-फडणवीस सरकारने सीमा प्रश्नावर समन्वय साधण्यासाठी मंत्र्यांची समिती नेमली आहे. या समितीत चंद्रकांत पाटील आणि शंभूराज देसाई यांचा समावेश आहेत. हे दोन्ही मंत्री उद्या बेळगावच्या दौऱ्यावर जाणार होते. याबाबत गेल्या आठवड्यात त्यांनी जाहीर केले होते. पण मंत्र्यांच्या दौऱ्यामुळे सीमा भागात कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता असल्याने हा दौरा रद्द करावा, असे आवाहन कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांनी केले.

## गुजरात निवडणुका जिंकण्यासाठी पंतप्रधानांनी बाजी लावली

### संजय राऊतांचा टोला

**। मुंबई । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**



पंतप्रधान म्हणूनही मोदींनी एक मोठा कालखंड गुजरालाच दिलेला आहे. ही त्यांची दुसरी टर्म आहे तरीही गुजरात निवडणुका जिंकण्यासाठी पंतप्रधानांना बाजी लावावी लागली. भारतीय जनता पक्षाचे तिकडे किती मोठे स्थान आहे हे यावरून स्पष्ट होते, अशा शब्दांत ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींना टोला लगावला.

पंतप्रधान म्हणूनही मोदींनी एक मोठा कालखंड गुजरालाच दिलेला आहे. ही त्यांची दुसरी टर्म आहे तरीही गुजरात निवडणुका जिंकण्यासाठी पंतप्रधानांना बाजी लावावी लागली. भारतीय जनता पक्षाचे तिकडे किती मोठे स्थान आहे हे यावरून स्पष्ट होते, अशा शब्दांत ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींना टोला लगावला. गुजरात विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यातील मतदान आज सुरू आहे. मतदानाला सुरूवात झाल्यानंतर पंतप्रधानांनी मतदानाचा हक्क बजावला.गुजरात निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर संजय राऊतांनी पंतप्रधानांना टोला लगावला.

राऊत म्हणाले की, “देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मधल्या काळात गुजरात बराच वेळा दिला. पंतप्रधान मोदी हे गुजरातचे तीन वेळा मुख्यमंत्री होते. पंतप्रधान म्हणूनही मोदींनी एक मोठा कालखंड गुजरालाच दिलेला आहे. ही त्यांची दुसरी टर्म आहे तरीही गुजरात निवडणुका जिंकण्यासाठी पंतप्रधानांना बाजी लावावी लागली. भारतीय जनता पक्षाचे तिकडे किती मोठे स्थान आहे हे यावरून स्पष्ट होते””खरं म्हणजे कोणत्याही प्रचाराशिवाय त्यांनी ती निवडणूक जिंकायला पाहिजे होती. पण पंतप्रधान, गृहमंत्री, भाजपा पक्षाध्यक्ष, संपूर्ण केंद्रीय यंत्रणा यांचासोबत गुजरातमध्ये मोदींनी प्रचार केला. तरीही निकाल काय लागेल हे सांगू शकत नाही, निकाल काहीही लागू द्या. लोक असे म्हणतात की निवडणूक यंत्रणेवरती आमचा विश्वास नाही.

## हिजाबसक्तीवरून इराण सरकार नरमले

### महिलांच्या आंदोलनाला यश

**। नागपूर । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**



इराणमध्ये महिलांनी हिजाब (Protest Against Hijab in Iran) घालावं याकरता संस्कृतीरक्षक पोलीस पथक नेमण्यात आले होते. याविरोधात इराणमधील महिलांनी तुफान आंदोलन केले. दोन महिने चाललेल्या आंदोलनाची दखल आता इराण सरकारने घेतले असून हिजाबसक्तीबाबत सरकारने नरमाईची भूमिका घेतली आहे. त्यानुसार, इराणमधील संस्कृतीरक्षक पोलीस हे पथक बंद करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे.

संस्कृतीरक्षण पोलीस हे पथक बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मात्र, हा निर्णय कायमस्वरुपी नसून तात्पुरत्या स्वरूपासाठी घेण्यात आला आहे, अशी माहिती इराणचे ॲटर्नी जनरल मोहम्मद जाफ मोंटाझेरी यांनी दिली.

इराणमध्ये सार्वजनिक ठिकाणी महिलांनी हिजाब परिधान करणे अनिवार्य करण्यात आले आहे. यासाठी संस्कृतीरक्षक पोलिसांची नेमणूक करण्यात आली आहे. महसा अमिनी या २२ वर्षीय तरुणीने हिजाबसंदर्भातील नियमांचे उल्लंघन केले. यावरून तिला संस्कृतीरक्षक पोलिसांनी तिला अटक केली. अटक झाल्यानंतर तिची प्रकृती खालावली गेली. त्यामुळे तिचा रुग्णालयातच मृत्यू झाला. संस्कृतीरक्षक पोलिसांनी तिचा जीव घेतल्याचा आरोप करत इराणमधील महिला पेटून उठल्या.

महसा अमिनला अटक केल्यानंतर पोलिसांनी तिला मारहाण केली, असा आरोप तिच्या घरच्यांनी केला होता. अनेक महिलांनी रस्त्यावर उतरत संस्कृती रक्षक पोलिसांविरोधात

# हिमाचलमध्ये भाजपा-काँग्रेसमध्ये चुरशीची लढत

## सत्ता परिवर्तनाची परंपरा कायम राहण्याची शक्यता!

**। नवी दिल्ली । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

हिमाचल प्रदेश विधानसभेच्या ६८ जागांसाठी ४१२ उमेदवार रिंगणात होते आणि या निवडणुकीसाठी १२ नोव्हेंबर रोजी एकाच टप्प्यात ७५.६ टक्के मतदान झाले होते. या निवडणुकीत मुख्यमंत्री जयराम ठाकुर, माजी मुख्यमंत्री विरभद्र सिंहांचे पुत्र विक्रमादित्य सिंह यांची प्रतिष्ठा पणाला लागली होती. तर, हिमाचल प्रदेशातील नागरिक भाजपाला पुन्हा संधी देतील, की विरोधी पक्ष काँग्रेससाठी सत्तेचा मार्ग मोकळा करतील, याची सर्वांना उत्सुकता आहे. ८ डिसेंबर रोजी निवडणुकीचा निकाल आहे. मात्र तत्पुर्वी विविध एक्झिट पोलनुसार निकाल समोर




आले आहे.

Aaj Tak-Axis My India च्या एक्झिट पोलनुसार हिमाचलप्रदेशमध्ये भाजपाला २४ ते ३४ आणि काँग्रेसला ३० ते ४० जागा मिळत असल्याचे दिसत आहे. आम आदमी पार्टीचा सुपडासाफ होण्याची चिन्हे आहेत. याशिवाय ४ ते ८ जागांवर अपक्ष उमेदवार निवडून येणार असल्याचे दाखवण्यात आले आहे. बहुमतासाठी ३५ जागा जिंकाव्या लागणार आहेत. भाजपाला ४२ टक्के मतं, काँग्रेसला ४४ टक्के आणि आम आदमी पार्टीला केवळ दोन टक्के मत मिळताना दिसत आहेत. हिमाचल प्रदेशच्या निवडणुकीसाठी पंतप्रधान नरेंद्र मोदींनी झंझावाती प्रचार केला होता. “उमेदवार बघू नका, कमळाला मत म्हणजेच मला मत”, असं म्हणत भाजपाला मतदान करण्याचं आवाहन मोदींनी नागरिकांना केलं होतं. निवडणूक काँग्रेससाठी अस्तित्वाची लढाई आहे. गेल्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसला पराभवाचा सामना करावा लागला होता. हा पराभव यावेळी विजयात बदलण्याचं आव्हान काँग्रेसपुढे होतं. मागील निवडणुकीत भाजपाने ६८ पैकी ४४ जागांवर विजय मिळवत बहुमताने सरकार बनवले होते. तर काँग्रेसला केवळ २१ जागा जिंकता आल्या होत्या. गुजरातप्रमाणेच हिमाचलमध्येही भाजपा, काँग्रेस आणि आम आदमी पार्टी यांच्यात त्रिशंकु लढत होती.

# मनोज बाजपेयी यांच्या आगामी चित्रपटाचे शूटिंग झाले पूर्ण



विनोद भानुशाली यांच्या भानुशाली स्टुडिओज लिमिटेड तसेच सुपर्ण एस वर्मा आणि झी स्टुडिओज आता प्रेक्षकांसाठी मनोज बाजपेयी अभिनीत एक पॉवर-पॅक कोर्टरूम ड्रामा घेऊन येण्यासाठी सज्ज झाले आहेत. या चित्रपटाचे जोधपूर शेड्यूल पूर्ण झाल्यानंतर निर्मात्यांनी चित्रपटाचे शूटिंग मुंबईत पूर्ण केले. अलीकडेच, मनोज बाजपेयी यांनी या अनटायटल्ड चित्रपटाचे शूटिंग पूर्ण केले असून हा चित्रपट 2023 मध्ये प्रदर्शित होण्याची अपेक्षा आहे.

चित्रपटाच्या शेवटच्या सीनचे शूटिंग करताना सर्व कलाकार आणि क्रू यांनी पॉवरहाऊस अभिनेता मनोज बाजपेयी यांचे उभे राहून अभिवादन केले, हा एक तीव्र कोर्टरूम सीन होता. यानंतर केक कापून चित्रपटाचे शूटिंग पूर्ण झाल्याचा आनंद साजरा करण्यात आला. तसेच, या बहुप्रतिक्षित चित्रपटात केलेल्या कामाबद्दल संपूर्ण टीमने कृतज्ञतादेखील व्यक्त केली. अशातच, दिग्दर्शक अपूर्व सिंग कार्की या हार्ड हिटिंग चित्रपटाद्वारे हिंदी चित्रपटांमध्ये पदार्पण करत असून या चित्रपटात उत्कृष्ट कलाकारांना पाहायला मिळेल.

झी स्टुडिओज आणि भानुशाली स्टुडिओज द्वारा प्रस्तुत, अपूर्व सिंग कार्कीद्वारा दिग्दर्शित, सुपर्ण एस वर्माच्या या कोर्टरूम ड्रामाची निर्मिती विनोद भानुशाली, कमलेश भानुशाली, आसिफ शेख आणि विशाल गुरनानी यांनी केली आहे. तसेच, हा चित्रपट 2023 मध्ये प्रदर्शित होण्याची अपेक्षा आहे.

# 500 रुपये पगारापासून मनीष मल्होत्राने केली होती करिअरची सुरुवात...

देशातील सुप्रसिद्ध फॅशन डिझायनर मनीष मल्होत्राचा आज 56 वा वाढदिवस आहे. बॉलिवूडमधील अनेक कलाकार मनीष मल्होत्राने डिझाइन केलेले ड्रेस परिधान करतात. बॉलिवूड कलाकारांचा हा सर्वाधिक आवडता डिझायनर आहे. मोठमोठ्या रँप वॉकमध्ये, रेड कार्पेट तसेच कलाकारांच्या लग्न समारंभामध्ये देखील बॉलिवूड कलाकारांची पहिली पसंत मनीष मल्होत्रा आहे. आजच्या काळात मनीष मल्होत्राकडे प्रचंड पैसा, संपत्ती आहे. मात्र, त्याच्या आयुष्यातील एक काळ असा होता ज्यावेळी त्याचा पगार फक्त 500 रुपये होता.

एका मुलाखतीत मनीष मल्होत्राने स्वतः आपल्या करिअरचा प्रवास सांगितला होता. त्यावेळी तो म्हणाला होता की, तो लहानपणापासून पंजाबमध्ये वाढला. त्याला जे काही करायचे होते त्यासाठी त्याच्या



आईने त्याला साथ दिली. अभ्यासाच्या बाबतीत तो थोडा कमी होता. बॉलिवूडसाठी आपलं प्रेम व्यक्त करत त्याने सांगितलं की, त्याला चित्रपट पाहण्याची खूप आवड होती. तो प्रत्येक चित्रपट आवर्जून पाहतो. तसेच सहावीमध्ये असताना त्याने चित्रकलेचा क्लास लावला होता. त्यावेळी त्याला कलर आणि आर्टसंबंधित गोष्टी त्याला आवडू लागल्या. यातून हळूहळू त्याला कपड्यांना फॅशन करणं आवडू लागलं. पुढे कॉलेजमध्ये गेल्यावर त्याने मॉडलिंगसोबत एका बुटिकमध्ये काम करायला सुरुवात केली. याठिकाणी तो डिझाइनच्या विविध पद्धती शिकला. त्यावेळी त्याला दर महिन्याला 500 रुपये पगार दिला जायचा. हळूहळू त्याने आपल्या कामामध्ये खूप मेहनत घेतली. वयाच्या 25 व्या वर्षी त्याला बॉलिवूडमधील पहिली संधी मिळाली. अभिनेत्री जुही चावलाच्या एका चित्रपटातील ड्रेस डिझाइन करण्याची त्याला संधी मिळाली. त्यानंतर त्यासाठी त्याला फिल्मफेअर अवॉर्ड देखील देण्यात आला. 2005 मध्ये मनीष मल्होत्राने आपलं लेबल लॉंच केलं.

# 'किसी का भाई किसी की जान'मधील लूक

बॉलिवूड अभिनेता सलमान खानचा 2022 मध्ये एकही चित्रपट प्रदर्शित झालेला नाही. त्याचे चाहते त्याच्या आगामी चित्रपटांची आतुरतेने वाट पाहत आहेत. सध्या सलमानचा 'किसी का भाई किसी की जान' चित्रपट प्रचंड चर्चेत आहे. हा चित्रपट 2023 मधील ईद दिवशी हा चित्रपट प्रदर्शित होणार आहे. तर दिवाळीमध्ये सलमानचा 'टायगर 3' चित्रपट प्रदर्शित होईल. दरम्यान, नुकतंच सलमानने त्याच्या सोशल मीडिया अकाऊंटवरुन त्याच्या 'किसी का भाई किसी की जान' चित्रपटाची शूटिंग पूर्ण झाली असून चित्रपटातील एक फोटो शेअर केला आहे. सलमानच्या या फोटोने सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे.

सलमान खानने शेअर केला 'किसी का भाई किसी की जान'मधील लूक



सलमान खानने त्याच्या ट्वीटर अकाऊंटवरु 'किसी का भाई किसी की जान'त्याच्या फर्स्ट लूक शेअर केला असून त्याने या चित्रपटाचे शूटिंग पूर्ण झाल्याची माहिती दिली आहे. तसेच या फोटोमध्ये त्याने ब्लॅक कलरचे डेनिम आणि टी-शर्टसोबत मल्टीकलरचे जॅकेट घातले आहे.

या चित्रपटाचे दिग्दर्शन फरहाद सामजीने केले असून या चित्रपटामध्ये सलमान सोबत पूजा हेगडे, शहनाज गिल, पलक तिवारी, सिद्धार्थ निगम, जस्सी गिल आणि राघव जुयाल दिसून येतील. तसेच व्यंकटेश आणि जगतपति बाबू देखील महत्वाच्या भूमिका साकारताना दिसतील.

# शाळकरी मुलीच्या भूमिकेत जिनिलिया

रितेश देशमुख दिग्दर्शित 'वेड' सिनेमाच्या गाण्यांनी सध्या सोशल मीडियावर नुसता धुमाकूळ घातलेला दिसत आहेत. सिनेमातील पहिलं गाणं 'वेड तुझा' रिलीज झालं तेव्हा जितकी क्रेझ तरुणाई मध्ये पहायला मिळाली, तेवढाच उत्साह सिनेमातील दुसरं गाणं 'बेसुरी; रिलीज झालं तेव्हा पहायला मिळाला. रितेश देशमुख आणि जिनिलिया देशमुख यांच्या 'वेड' सिनेमाची उत्स्कुता सर्वत्र वाढली आहे . IMDB या साईट वर मोस्ट ऍंटीसिपेटेड फिल्म म्हणून पहिल्या क्रमांकावर फिल्म ट्रेंड होत आहे.

'वेड' च्या निर्मात्यांनी ' बेसुरी' हे गीत आज प्रदर्शित केले आहे . हे गीत वसुंधरा वी यांनी गायले आहे आणि अजय अतुल यांनी संगीतबद्ध केले आहे . या गाण्यात रितेश आणि जिनिलिया शाळकरी मुलांच्या लूकमध्ये दिसत आहेत. जिनिलियानं तर काळ्या रिबिनीनं घट्ट बांधलेल्या दोन वेण्यांमध्ये काळीज चोरलं आहे.तसंही जिनिलियानं आतापर्यंतच्या सर्वच सिनेमातून तिच्या सालस रुपानं अनेकांना घायाळ केलं होतं. आता पुन्हा एकदा जिनिलिया 'वेड' सिनेमातून तो सालस रंग आपल्या चाहत्यांसाठी घेऊन येतेय.



# वायरल फ्रायडे' द हाऊसफुल शो




'पैचान कौन?' या प्रश्नामुळे लोकप्रिय झालेला स्टँडअप कॉमेडीयन नवीन प्रभाकर सूत्रसंचालकाच्या नव्या भूमिकेतून आपल्या समोर येणार आहे. नवीन प्रभाकर सूत्रसंचालन करत असलेल्या शोचे नाव 'वायरल फ्रायडे' विथ नवीन प्रभाकर' आहे. हा शो पूर्णपणे सिनेमाला वाहिलेला आहे. काही सिनेमे हे माइल स्टोन असतात. त्यामुळेच तर ते प्रेक्षकांच्या कायम स्मरणात असतात. आज काल त्याच सिनेमांचे रिल्स बनतात. ते मोठ्या प्रमाणावर व्हायरलही होतात. 'वायरल फ्रायडे'मधून असेच मनाच्या कोपऱ्यात घर करून राहिलेले सिनेमा आपल्या भेटीस येणार आहेत. नवीन प्रभाकर या शोच्या माध्यमातून संस्मरणीय सिनेमांच्या आठवणींची पोतडी त्याच्या अनोख्या स्टाईलमध्ये आपल्या समोर उलगडणार आहे. या शोचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे अभिनेत्री सारा श्रवण या शोची मुख्य निर्माती असून ती 'फर्स्ट रे स्टुडिओ'द्वारे निर्मिती क्षेत्रात पदार्पण करत आहे.

# पाकिस्तान जिंकता जिंकता हरले!

## पहिल्याच कसोटीत इंग्लंडने लोळवले

**दोहा । महाईन्यूज । वृत्तसंस्था**



तब्बल 17 वर्षानंतर पाकिस्तानचा दौरा करणाऱ्या इंग्लंडने पाकिस्तानला पहिल्याच कसोटीत पाणी पाजले. इंग्लंडने पाकिस्तानचा 74 धावांनी पराभव करत पाकिस्तानचा विजयी घास हिसकावून घेतला. विशेष म्हणजे इंग्लंडचा हा पाकिस्तानमधील फक्त तिसरा कसोटी विजय आहे.

दुसऱ्या डावात पाकिस्तानला विजयासाठी 360 धावांची गरज होती. मात्र पाकिस्ताने पाचव्या दिवशीच्या शेवटच्या सत्रात विजयासाठी 86 धावांची गरज होती. पाकिस्तानच्या हातात अजून 5 विकेट्स शिल्लक होत्या. मात्र इंग्लंडच्या गोलंदाजांनी शेवटच्या सत्रात भेदक मारा केला. ऑली रॉबिन्सन आणि जेम्स अँडरसन यांनी पाकिस्तानचा दुसरा डाव 268 धावांवर संपवला. पाकिस्तानची शेवटची जोडी नसीम शाह आणि मोहम्मद अली यांनी 88 व्या षटकापर्यंत लढत देत सामना अनिर्णित राखण्याचा प्रयत्न केला. मात्र जॅक लिचने हा प्रयत्न हाणून पाडला.

रावळपिंडीच्या पाटा विकेटवर इंग्लंडने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. इंग्लंडने पहिल्याच दिवशी 506 धावा ठोकत धावांचा पर्वत उभारला. पहिल्याच दिवशी चार जणांनी शतकी खेळी केली. इंग्लंडने पहिल्या डावात 101 षटकात 657 धावा ठोकल्या. यात हॅरी ब्रुक (153), झॅक क्राऊली (122), डकेट (107) आणि ऑली पोप (108) यांनी शतकी खेळी केली. पाकिस्तानकडून झायेद मेहमूदने 4 तर नसीम शाहने 3 विकेट्स घेत अखेर इंग्रजांचा डाव 654 धावात संपवला. यानंतर पाकिस्तानने देखील पहिल्या डावात दमदार फलंदाजी करत सर्वबाद 576 धावा केल्या. पाकिस्ताकडूनही शफिक (114), इमाम उह हक (121), बाबर आझमने (136) यांनी शतकी खेळी केली. सामन्यात पडणारा धावांचा पाऊस पाहून सामना अनिर्णित होणार की काय शक्यता वर्तवली जात होती. मात्र इंग्लंडने पहिल्या डावात 78 धावांची आघाडी घेतली.

दुसऱ्या डावात इंग्लंडने 7 बाद 264 धावा करत पाकिस्तानसमोर विजयासाठी 342 धावांचे आव्हान ठेवले. पहिल्या डावात 153 धावांची दिडशतकी खेळी करणाऱ्या हॅरी ब्रुकने दुसऱ्या डावात देखील 87 धावांची खेळी केली. दुसऱ्या डावात पाकिस्तानने खराब सुरूवातीनंतर सामन्यावर पकड मिळवण्यास सुरुवात केली होती. इमाम उल हक (48) अझर अली (40) यांनी डाव सावरण्याच्या प्रयत्न केला. यानंतर सौद शकील (76) आणि मोहम्मद रिझवान (46) यांनी पाकिस्तानच्या विजयाची आशा पल्लवित केली. पाचव्या दिवशीच्या तिसऱ्या सत्रात पाकिस्तानच्या हातात 5 विकेट्स होत्या आणि विजयासाठी त्यांना 86 धावांची गरज होती. मात्र रॉबिन्सन आणि अँडरसन यांनी प्रभावी मारा करत 9 बाद 264 धावा अशी केली. सामना इंग्लंडच्या हातात आला होता.

दरम्यान, नसीम शाह आणि मोहम्मद अली यांनी तब्बल 12 षटके खेळून काढत शेवटपर्यंत झुंज दिली. हे दोघे इंग्लंडला विजयापासून दूर ठेवणार असे वाटत असतानाच जॅक लीचने 46 चेंडूत 6 धावा करणाऱ्या नसीम शाहला बाद करत शेवटच्या क्षणी

# विश्वचषकात शेफाली वर्मा करणार भारतीय महिला संघाचे नेतृत्व

**नवी दिल्ली । महाईन्यूज । वृत्तसंस्था**




भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (BCCI) अंडर-19 T20 विश्वचषकासाठी टीम इंडियाची घोषणा केली आहे. वरिष्ठ संघात आपली प्रतिभा सिद्ध करणाऱ्या हरियाणाच्या शेफाली वर्माची संघाच्या कर्णधारपदी निवड करण्यात आली आहे. 'अखिल भारतीय महिला निवड समितीने ICC अंडर-19 महिला विश्वचषक आणि दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या 'टी-20I मालिकेसाठी भारताच्या अंडर-19 महिला संघाची निवड केली आहे," असे बीसीसीआयने एका निवेदनात म्हटले आहे.

ICC अंडर-19 महिला विश्वचषकाच्या पहिल्या आवृत्तीत 16 संघ सहभागी होणार आहेत. ही स्पर्धा दक्षिण आफ्रिकेत 14 ते 29 जानेवारी 2023 या कालावधीत होणार आहे. भारताला ड गटात दक्षिण आफ्रिका, संयुक्त अरब अमिराती आणि स्कॉटलंडसह स्थान देण्यात आले आहे. प्रत्येक गटातील अव्वल तीन संघ सुपर सिक्स फेरीत प्रवेश करतील, जिथे संघांना सहा जणांच्या दोन गटात ठेवण्यात येणार आहे. प्रत्येक गटातील अव्वल दोन संघ उपांत्य फेरीत जातील, जे 27 जानेवारीला पॉचेफस्ट्रूम येथील जेबी मार्क्स ओव्हल येथे खेळले जातील. याच मैदानावर 29 जानेवारीला अंतिम सामना होणार आहे.

शेफाली दीर्घकाळापासून भारताकडून खेळत असून तिची कामगिरी चांगली चालु आहे. अशा स्थितीत त्याच्यासोबत खेळणे संघातील उर्वरित युवा खेळाडूंना खूप उपयुक्त ठरणार आहे. शेफालीशिवाय रिशा घोषनेही भारताच्या मुख्य संघासाठी अनेक सामने खेळले आहेत. त्याचा पाठिंबा इतर खेळाडूंनाही खूप उपयुक्त ठरेल.

महिला अंडर-19 विश्वचषक प्रथमच आयोजित केला जात आहे. महिला क्रिकेटला प्रोत्साहन देण्यासाठी आयसीसी सातत्याने प्रयत्न करत आहे. याच भागात महिला विश्वचषकाला सुरुवात झाली आहे.

## भैरवनाथ, जयवंत क्रीडा प्रतिष्ठान,

# बाणेर युवा संघांची विजयी सलामी!

### खुला गट जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी : सोमेश्वर स्पोर्ट्स क्लब, मयुरेश्वर कबड्डी संघ पराभूत

**पुणे। महाईन्यूज । वृत्तसंस्था**



भैरवनाथ भोसरी व जयवंत क्रीडा प्रतिष्ठान या संघानी आपापल्या प्रतिस्पर्धी संघाना पराभूत करतना कै. प्रकाश (बापू) सणस यांच्या स्मरणार्थ, सरस्वती क्रीडा संस्थेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या खुल्या गटाच्या जिल्हा अजिंक्यपद व निवड चाचणी कबड्डी स्पर्धेत विजयी सलामी दिली.

नातूबाग येथील मैदानावर आजपासून सुरु झालेल्या स्पर्धेचे उद्घाटन राष्ट्रवादी कॉंग्रेसचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी माजी महापौर कमल व्यवहारे, दत्तात्रय धनकवडे, जिल्हा कबड्डी संघटनेच्या कार्याध्यक्षा वासंती बोर्डे, सरस्वती क्रीडा संस्था पुणेचे अध्यक्ष राजेंद्र देशमुख, अर्जुन पुरस्कार विजेते शांताराम जाधव, नगरसेवक गोपाळ चिंतल, भाऊ चव्हाण, राजेंद्र मोरे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

आज झालेल्या सलामीच्या लढतीत भैरवनाथ भोसरी संघाने मयुरेश्वर कबड्डी संघाला ३४-३ असे ३१ गुणांनी पराभूत करताना विजयी सलामी दिली. भैरवनाथ संघाने मध्यंतराला २१-१ अशी महत्वपूर्ण आघाडी घेतली होती. भैरवनाथ संघाकडून श्रीकांत चव्हाण, शुभम घुले, धीरज स्वामी, अभिषेक वेदपाठक यांनी संघाच्या विजयात मोलाचा वाटा उचलला. मयुरेश्वर संघाकडून आदित्य भोले याने लढत देण्याचा प्रयत्न केला.

दुसऱ्या लढतीमध्ये जयवंत क्रीडा प्रतिष्ठान, मुंढवा संघाने सोमेश्वर स्पोर्ट्स क्लब संघाला ४१-६ असे एकतर्फी पराभूत केले. मध्यंतराला जयवंत संघाने २२-३ अशी आघाडी घेतली होती. जयवंत संघाकडून दत्ता कोळी, सागर पवार, तुषार पवार यांनी सुरेख चढाया तर सिद्धांत चव्हाणने पकडी करताना संघाला विजय मिळवून दिला. सोमेश्वर संघाकडून कृष्णा घोलपने पकडी तर साहिल झोरेने चढाया केल्या.

बाणेर युवा कबड्डी संघाने नुमवि प्रशाला संघाला ४१-१२ असे पराभूत केले. मध्यंतराला बाणेर युवा संघाने २६-३ अशी विजयी आघाडी घेतली होती. बाणेर युवा संघाकडून ऋषी सुरवसे व नरेंद्र साळवे यांनी चांगल्या पकडी केल्या तर, योगेश शिंगटे व विनोद चौधरी यांनी आक्रमक चढाया करताना संघाच्या विजयात मोलाचा वाटा उचलला. नुमावी संघाकडून रोहित खाडेकर, सार्थक दिघे यांनी लढत देण्याचा प्रयत्न केला.